# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०५/२०२४ (बुधवार) दुपार**


---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपींना अटक

**पोस्टे खापरखेडा:–** अंतर्गत मौजा तट्टर नाल्याजवळ सिल्लेवाडा येथे दिनांक ०६/०५/२०२४ रोजी जुन्या वादाचे कारणावरून मृतक नामे मोहम्मद शहीद उर्फ चट्टीला सैय्यद यास आरोपी क्र. १) नामे– हबीब उर्फ छोटू अहमद सलमानी वय २७ याने हातोडी ने डोक्यावर व डाव्या कानावर व आरोपी क्र २) नासिर अहमद सलमान वय २४ वर्ष दोन्ही रा.सिल्लेवाडा याने लाठीने मारून शहीद उर्फ चट्टीला सैय्यद यास जिवानिशी ठार केले. सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तनिज शाबीर अली सय्यद, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ५ सील्लेवाडा खापरखेडा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन तपास पथक नेमुन आरोपीचा शोध घेतला असता यातील आरोपी क्र. १) व २) यांना सावनेर येथुन अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि. धनाजी जळक मो. नं ७०५७९६४७४७ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोहवा शैलेश यादव, प्रफुल राठोड, मुकेश वाघाडे, राजू भोयर राजकुमार सातुर, विनोद दायमा, कविता गोंडाणे यांनी पार पाडली.

### जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे खापरखेडा अंतर्गत देशी दारूचे भट्टी, रेल्वे स्टेशन खापरखेडा रोड येथे दिनांक ०६/०५/२०२४ रोजी २०.३० वा. पासुन २०.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– विकास रमेश बागडे, वय ३९ वर्ष, रा. मेश्राम वाडयाच्या बाजूला खापरखेडा हे आपले कुऱ्यासह हजर असता **आरोपी क्र. १) सुरज दिनेश उईके वय १८ वर्ष रा. जयभोले नगर खापरखेडा २) सूभाष डोमाजी ब्राम्हणकर, वय २५ वर्ष रा. भानेगाव ०३) विधीसंघर्ष बालक** हे तेथे आले असता फिर्यादीचा कुत्रा त्यांच्यावर भुंकला असता विधीसंघर्ष बालक याने त्याला लाथ मारली असता फिर्यादीने त्याचे गालावर थापड मारली या कारणावरून विधीसंघर्ष बालक याने धारदार चाकुने दोन्ही दंडावर वार केला व आरोपी क्र. १, २ यांनी विटाने व हातभुक्कीने मारून फिर्यादीला जखमी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयन्त केला. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे २४४/२४ कलम ३०७, ३४ भा.द.वी अन्वये गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपीचा शोध घेत असता पोस्टे खापरखेडा येथील डीबी पथकास मुखबिरकडुन गोपनिय माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी हे खापरखेडा हद्दीत संशयीतरीत्या फिरत आहे. अशी गोपनीय माहिती मिळाल्याने खापरखेडा हद्दीत सापळा रचून **आरोपी नामे– १) सुरज दिनेश उईके वय १८ वर्ष रा. जयभोले नगर खापरखेडा २) सूभाष डोमाजी ब्राम्हणकर, वय २५ वर्ष रा. भानेगाव** यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोहवा शैलेश यादव, प्रफुल राठोड, मुकेश वाघाडे, राजू भोयर राजकुमार सातुर, विनोद दायमा, कविता गोंडाणे यांनी पार पाडली.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीस अटक

दि. ०८/०५/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. खापरखेडा हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिर कडून खबर मिळाली की, मोहम्मद इर्शान अन्सारी, वय ३३ वर्ष, रा. कामठी यानी चिंचोली येथे त्यांचे राहते घरी त्याचे सोबत राहणाऱ्या महिलेचा खून केला आहे. तरी सदर आरोपीस चौकशी कामी इरसाद यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता सदर मृतक महिला नामे कांचन बरशे, वय ३५ वर्ष, रा. न्यू येरखेडा कामठी हिच्यासोबत ०७ वर्षापासून सोबत राहात होतो. दिनांक ०७/०५/२०२४ चे रात्री १०.३० वा. दरम्यान चीचोली येथील घरी आमचा वाद झाला यात आरोपीने मृतकाच्या डोक्यावर विटीने मारुन तीचा खुन केला असे सांगितले आरोपी नामे इरसाद मोहम्मद फिरोज अन्सारी, वय ३३ वर्ष, रा. कामठी यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे PSI बडुलाल पांडे ASI नाना राऊत, HC विनोद काळे, ईकबाल शेख प्रमोद भोयर NPC विरु नरड संजय बरोदीया, निलेश इंगुलकर चालक मोनू शुक्ला यानी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर